महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । मंगळवार, ३१ जुलै २०१८



प्रशिक्षण कार्यक्रमात बोलताना शिक्षण समितीसभापती अशोक जाधव

# लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण कायद्याविषयी प्रशिक्षण

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'मुलांचे लैंगिक शोषण ही गंभीर समस्या असून त्याचे पूर्णपणे उच्चाटन करण्यासाठी जनजागृतीची आवश्यकता आहे', असे मत शिक्षण समितीचे सभापती अशोक जाधव यांनी व्यक्त केले. महानगरपालिका शाळांतील शिक्षकांसाठी लैंगिक शोषण समस्येबाबत तसेच लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण कायद्याविषयी पाच दिवसीय विशेष प्रशिक्षणाला सुरुवात झाली. त्यावेळी ते बोलत होते.

शहरातील तीन केंद्रांवर अर्पण संस्थेकडील आठ तज्ज्ञ याबाबत शिक्षकांना मार्गदर्शन करणार आहेत. प्राथमिक शिक्षण समिती व महिला व बालकल्याण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण दिले जात आहे.

प्रशासनाधिकारी शंकर यादव म्हणाले, 'लैंगिकता हा विषय संवेदनशील आहे. या विषयाबाबत फारसे खुलेपणाने बोलले जात नाही. शालेय जीवनात किमान गोष्टींची माहिती मुलामुलींना होणे आवश्यक आहे. लैंगिक शोषणाच्या घटनांमुळे निरागस मुलांचे आयुष्य अंधःकारमय होण्याची शक्यता असते. त्यामुळे या विषयाबाबत शिक्षक,विद्यार्थी, पालक,पाल्य यांच्यात विश्वास निर्माण होणे गरजेचे आहे.'

महिला व बालकल्याण समिती सदस्या सुरमंजिरी लाटकर यांच्या पुढाकाराने पहिल्यांदाच आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणात सोनाली परब, सुविद्या गायकवाड, दिपाली खरात, निलम खरे, दिपाली कदम, सरोज सालपे, राज नारायण व अमेय कोरगांवकर मार्गदर्शन करणार आहेत.